68

F-165

(99)

क्रमांक: एलसीएस-२६९३/प्र.क्र. ४८८२/ज३,
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक: ११ जून, १९९६

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे वांद्रे [पूर्व] स. नं. ३४१ [भाग] पैकी
१६८६.४ चौ. मी. जमीन
राज्य शासनाच्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या
नियोजित अस्मीन सहकारी गृहनिर्माण
संस्थेस देण्याबाबत --

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई-४०००५१ यांना त्यांच्या क्रमांक-कार्यासन-३अ/कावि/२, दिनांक २५.१.१९९६ व शासन हेतुपत्र समक्रमांक दिनांक २६.१२.१९९५ च्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात मला निदेश आहे की, मौजे वांद्रे [पूर्व] स. नं. ३४१ पैकी सुमारे १६८६.४ चौ.मी. जमीन राज्य शासनाच्या सेवेतील अधिकारी यांच्या नियोजित अस्मीन सहकारी गृहनिर्माण संस्थेस सोबतच्या यादीत नमूद करण्यात आलेल्या मंजूर सभासदांची निवासाची व्यवस्था करण्यासाठी शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक एलसीएस-१९८३/प्र.क्र.२२२/ज४, दिनांक १२.५.१९८३ मधील तरतुदीनुसार व सोबतच्या जोडपत्र दोन मध्ये दर्शविलेल्या अटी/शर्ती तसेच खालील अतिरिक्त अटींवर व शर्तींवर मंजूर करण्यास शासनाने आता मान्यता दिली आहे.

[१] शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एलसीएस-१०९२/प्र.क्र.१७५/ज१, दिनांक १८.१२.१९९२ मधील तरतुदीनुसार सदर जमिनीची दिनांक १.१.१९९६ रोजी बाजारभावाची किंमत नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाकडून ठरवून घेण्यात यावी व दि. १२.५.१९८३ च्या धोरणात्मक आदेशातील तरतुदीनुसार उत्पन्न गटानुसार देय ठरणारी कब्जेहक्काची सवलतीची किंमत प्रति शाईल्या संस्थेकडून यथावकाश वसूल करावी. दरम्यान सदर जमिनीचे तात्पुरते मूल्यांकन प्रति चौ.मी.ला रु. २२२५/- [रुपये दोन हजार दोनशे पंचवीस फक्त] प्रमाणे मानून धोरणात्मक आदेशातील तरतुदीप्रमाणे देय ठरणारी जमिनीची तात्पुरती कब्जेहक्काची किंमत संस्थेकडून वसूल करावी.

..२/-

10447

For further steps... urgent

6/2/7/96

26/2/96

(२) प्रश्नांकित जमिनीची उपरोल्लेखित निर्णय दिनांक १८.१२.१९.. प्रमाणे अंतिम किंमत ठरविण्यात आल्यावर ती तात्पुरत्या किंमतीपेक्षा अधिक असल्याचे आढळून आले तर वरीलप्रमाणे भरण्यात आलेली कब्जेहक्काची तात्पुरती रक्कम व अंतिम किंमत यातील फरकाची रक्कम जमिनीचा ताबा दिल्याच्या दिनांकापासून त्या रकमेचा शासनास पूर्णत: भरणा केल्याच्या तारखेपर्यन्तच्या कालावधीकरिता प्रचलित दराने व्याजासह वसूल करावी.

(३) शासनाद्वारे अंतिमरित्या ठरविली जाणारी किंमत विना तक्रार मान्य करण्यात येईल व त्याप्रमाणे देय ठरणारी फरकाची रक्कम व जमिनीचा ताबा घेतल्यापासून या रकमेचा भरणा होईपर्यन्तच्या अवधीसाठी त्या रकमेवर प्रचलित दरानुसार देय होणारे व्याज लावून रक्कम तत्संबंधी सूचना जिल्हाधिकाऱ्यांकडून मिळाल्यापासून एक महिन्यात एक रकमी भरण्यात येईल असे मुद्रांकित हमीपत्र संस्थेकडून घेऊन मंजूर जमिनीचा ताबा संस्थेस देण्यात यावा.

२. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी संस्थेकडून योग्य तो करारनामा करून घ्यावा आणि संस्थेची नोंदणी झाल्यावर मंजूर जमिनीचा रितसर ताबा देण्याची कार्यवाही करावी.

३. हे ज्ञापन, वित्तविभागाच्या सहमतीने [वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २७०/व्यय-९, दिनांक १४.३.१९९६] निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[वि.के. आल्हाट]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

सोबत : जोडपत्र एक व दोन.

प्रत,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
बी. एम. आर. डी. अ. इमारत,
वान्द्रे (पू) मुंबई-४०००५१

प्रतिलिपी:-

१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

२] सहायक संचालक, नगररचना, मुंबई.

३] महालेखापाल, मुंबई.

४] महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई.

५] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

६] उपसंचालक भूमी अभिलेख, नवी मुंबई

७] वित्त विभाग [व्यय-१] मंत्रालय, मुंबई

८] जड कार्यासन, [निवडनस्तीकरिता] महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

क्र. ११/३३/९५-०१५५

213

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
बी.एम.आर.डी.ए. इमारत, ३ रा माळा
वांद्रे [पूर्व], मुंबई - ५१.

दिनांक : १०-९-१९९६

वाचले :- १] शासन, महसूल व वन विभाग ज्ञापन क्र. एलाएन-२५९७/प्र.क्र. ४८८२/
ज-३, दि. ११.७.९६.
२] या कार्यालयाचे पत्र सम क्रमांक दिनांक २४.७.९६.
३] अस्मिन सहकारी गृह निर्माण संस्थेचे पत्र दि. ७.८.९६ व ३१.८.९६
४] सहाय्यक निबंधक, सहकारी गृह निर्माण संस्था, एच पूर्व विभाग
यांजकडील नोंदणीचे प्रमाणपत्र, दिनांक १९.८.९६.
५] करारनामा दिनांक ३१.८.१९९६.

## आ दे श

मौजे बांद्रा, तालुका अंधेरी, मुंबई उपनगर जिल्हा येथील सर्वे क्रमांक ३४१ पैकी क्षेत्र १६८६.४ चौ.मी. जमिन अस्मिन सहकारी गृहनिर्माण संस्थेत जोडपत्र एक मधील मंजूर सभासदांचा निवास स्थानासाठी मंजूर करण्यात येत आहे. सभासद यादीमध्ये एक जागा रिक्त ठेवण्यात आली असून सदर जागा भरण्यासंदर्भात संस्थेकडून प्रस्ताव प्राप्त होताच त्याबाबत स्वतंत्र आदेश काढण्यात येतील. संस्थेने जमिनीची तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम रु. ३७,५२,२४०/- [रु. सदोतीस लाख बावन्न हजार दोनशे चाळीस मात्र ] पे ऑर्डर दिनांक ७.८.९६ ने भरली असून, जर जमिनीची अंतिम कब्जेहक्काची रक्कम, तात्पुरत्या कब्जेहक्काच्या रकमेपेक्षा जास्त आल्यास, दोहोंमधील फरकाची रक्कम विहित व्याज दराने भरण्यास तयार असल्याबाबत हमीपत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे संस्थेची सहकारी कायदा अंतर्गत क्र. बीओएम/डब्ल्यू एच ई/ एचएसजी/[टिसी] ९४२१/१९९६, दिनांक १९.८.९६ ने नोंदणीकृत झालेला आहे. संस्थेने दिनांक ३१.८.९६ रोजी शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा केलेला आहे. त्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तीस अधीन राहून भूधारणाधीन शासकीय जमीन संबंधित संस्थेत मंजूर करण्यात येत आहे.

सही/-
[संजय चहांदे]
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,
श्री. एस.ओ.एस. यादव, चेअरमन,
अस्मिन सहकारी गृहनिर्माण संस्था,
द्वारा, - पोलिस उप महानिरीक्षक, लोहमार्ग, मुंबई यांचे कार्यालय,
रेल्वे बिल्डींग, पहिला माळा, महर्षि कर्वे रोड,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, जमिनीचा ताबा मिळण्यासाठी त्यांनी नगर भूमापन अधिकारी क्र. ३ मुंबई महानगरपालिका, वॉर्ड ऑफिस, बस डेपो समोर, स्वामी विवेकानंद रोड, सांताक्रुझ [पश्चिम], मुंबई-५४ यांचेशी संपर्क साधावा.

[कृ.मा.प.]

प्रत :- करारनाम्याच्या प्रतीसह.

१) नगर भूमापन अधिकारी क्र.३ यांजकडे रवाना.
त्यांना विनंती करण्यात येते की, प्रश्नाधीन जमिनीचा ताबा तहसिलदार अंधेरी आणि मंडळ अधिकारी यांचे समक्ष घेऊन, नगर भूमापन अभिलेखात योग्य ते फेरफार करून त्याच्या उताऱ्यासह, ताबा पावती व नकाशाच्या प्रतीसह अहवाल सादर करावा.

२) तहसिलदार अंधेरी यांजकडे रवाना.
त्यांनी संबंधीत मंडळ अधिकारी यांना जागेचा ताबा देतेवेळी जागेवर हजर राहण्यास सांगावे व जमिनीचा ताबा दिल्यावर गावच्या अभिलेखात योग्य ते फेरफार करून पूर्तता अहवाल सादर करावा.

३) सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, एच पूर्व विभाग, सहकार भंडार, ४ था मजला, बांद्रा (पश्चिम), मुंबई.

स्थळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

ता/-१०.९.९६

Received
11/9
(S.R. Pandhare)

न्वये मंजु

अ.क्र.

१.
२.
३.
४.
५.
६.
७.
८.
९.
१०.
११.
१२.
१३.
१४.
१५.

215

ह्या कार्यालयाचे आदेश क्र. ११/३ अ/एफ-०१६५, दिनांक १०-८-१९९६ अन्वये मंजूर केलेल्या सभासदांची यादी.

| अ.क्र. | सभासदाचे नाव | नोकरी/व्यवसाय | कौटुंबिक मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|
| १. | श्री. शिव प्रतापसिंग यादव | नोकरी | १६,०००/- |
| २. | श्री. प्रेम किशन जैन | -"- | १३,०००/- |
| ३. | श्री. दादाजी लक्ष्मी प्रसाद | -"- | १०,०००/- |
| ४. | श्री. संजीव बजाज | -"- | १४,०००/- |
| ५. | श्री. कृष्णलाल रामनारायण बिश्नोई | -"- | ८,८६३/- |
| ६. | श्री के. रामचंद्रन [ अनुसूचित जाती ] | -"- | ४८,०००/- |
| ७. | श्री. सुरेंद्रकुमार -"- | -"- | २२,०००/- |
| ८. | श्री. अशोककुमार शर्मा | -"- | १५,०००/- |
| ९. | श्री. हेमंत कमलाकर करकरे | -"- | १६,०००/- |
| १०. | श्री. दत्तात्रय देवीदास पडसलगीकर | -"- | २३,०००/- |
| ११. | श्री. वसंत लक्ष्मण गवई [अ.जा.] | -"- | ११,५८२.०० |
| १२. | श्री. डी.टी. चोतिक | -"- | १९,०००/- |
| १३. | श्री. के.पी. रघुवंशी | -"- | १०,०००/- |
| १४. | श्री. विजयकुमार गौतम | -"- | १२,०००/- |
| १५. | रिक्त श्री [illegible] | -"- | — |

मूळ प्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही आहे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.